## आजचे पंचांग

सोमवार दि. १३ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, एकादशी रात्री १-०९ पर्यंत, दिवस नक्षत्र– धनिष्ठा दुपारी ४-०४ पर्यंत
चंद्र रास - कुंभ, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन



# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## पुण्याचा नकोसा लौकिक

**पुणे:** केंद्र सरकारकडून देशातील प्रमुख २३ शहरांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाकडे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पाठ फिरवली आहे. केंद्राने निश्चित करून दिलेल्या मुदतीत पालिकेच्या केवळ चार टक्के कर्मचाऱ्यांनीच ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले असून, या २३ शहरांमध्ये पुणे महापालिका थेट २१ व्या क्रमांकावर घसरले असून, हा नकोसा लौकिक नावावर झाला आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 — सोमवार, दि. १३ एप्रिल, २०२६ — वर्ष - १ अंक - १९८ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### राष्ट्रपती मुर्मू गुजरात आणि महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सोमवारपासून गुजरात आणि महाराष्ट्राच्या चार दिवसीय दौऱ्यावर असतील, असे त्यांच्या कार्यालयाने सांगितले आहे. त्या सोमवारी एम्स राजकोटच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत, असे सांगण्यात आले. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गांधीनगर येथील लोक भवनात आयोजित 'सामाजिक समरसता महोत्सवा'ला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत, असे राष्ट्रपती भवनाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### आणखी १२ भारतीय मच्छिमारांना अटक

**कोलंबो :** श्रीलंकेच्या सागरी हद्दीत बेकायदेशीर मासेमारी केल्याच्या आरोपावरून श्रीलंकेच्या नौदलाने आणखी किमान १२ भारतीय मच्छिमारांना अटक केली असून त्यांची ट्रॉलर बोट जप्त केली आहे. ११ एप्रिलच्या रात्री श्रीलंकेच्या नौदलाने जाफनाच्या करैनागरमधील कोविलमजवळ श्रीलंकेच्या सागरी हद्दीत बेकायदेशीर मासेमारी करत असताना एक भारतीय मासेमारी बोट जप्त केली आणि १२ भारतीय मच्छिमारांना ताब्यात घेतले.

### वाँटेड गुंडाला १४ वर्षांनंतर अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली आणि पंजाबमधील दरोडेखोरी आणि लुटमारीच्या अनेक प्रकरणांप्रकरणी जवळपास १४ वर्षांपासून फरार असलेल्या एका गुंडाला दिल्ली पोलिसांनी अटक केली. उत्तर प्रदेशातील गोंडा येथील अर्जुन प्रसाद (४४) उर्फ अर्जुन पासी याला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले.

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन; आज अंत्यसंस्कार

# संगीतसृष्टीतील अजरामर पर्वाची सांगता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांनी सात दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे रविवारी मुंबईत निधन झाले.

शनिवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आणि छातीत संसर्ग झाल्यामुळे दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान प्रकृती अधिकच खालावल्याने आज दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वातील एक तेजस्वी तारा मावळला असून, त्यांच्या स्वरांची मोहिनी मात्र कायम रसिकांच्या मनात घुमत राहणार आहे.

शनिवारी संध्याकाळी त्यांना श्वास घेण्यास त्रास आणि अशक्तपणा जाणवू लागल्याने तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले होते. डॉक्टरांच्या विशेष पथकाकडून आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. सोमवारी सायंकाळी ४ वाजता दादर येथील शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतसृष्टीतील एक अजरामर पर्व संपल्याची भावना व्यक्त होत आहे.

आशा भोसले यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नव्हे, तर २० हून अधिक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये १०,००० पेक्षा जास्त गाणी गायली. रोमँटिक, गझल, शास्त्रीय तसेच 'दम मारो दम' सारख्या पॉप शैलीतील गाण्यांमधून त्यांनी आपले अष्टपैलूत्व सिद्ध केले.

८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे त्यांचा जन्म झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांना संगीताचा वारसा मिळाला. अवघ्या ९ व्या वर्षी वडिलांचे निधन झाल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आणि लता मंगेशकर यांच्यावर आली. १९४३ मध्ये 'माझा बाळ' या मराठी चित्रपटातील 'चला चला नव बाळा' हे त्यांचे पहिले गाणे ठरले, तर १९४८ मध्ये 'चुनरिया' चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले.

कारकीर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांना दुय्यम स्वरूपाची गाणी मिळत होती. मात्र संगीतकार ओ. पी. नय्यर यांनी त्यांच्या आवाजातील वैशिष्ट्य ओळखले. 'नया दौर' (१९५७) मधील 'मांग के साथ तुम्हारा' आणि 'उडे जब जब जुल्फें तेरी' या गाण्यांमुळे त्यांना मोठी लोकप्रियता मिळाली.

संगीतकार आर. डी. बर्मन यांच्यासोबतच्या जोडीने त्यांनी भारतीय संगीतात नवे पर्व घडवले. 'दम मारो दम' आणि 'पिया तू अब तो आजा' यांसारख्या गाण्यांनी त्यांना 'पॉप क्वीन' ही ओळख मिळाली. 'उमराव जान' (१९८१) मधील गझलांनी त्यांच्या गायकीची गंभीर बाजूही अधोरेखित केली आणि त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. वयाच्या साठीनंतरही त्यांनी स्वतःला काळानुसार बदलले. ए. आर. रहमान यांच्या 'रंगीला' (१९९५) चित्रपटातील 'तनहा तनहा' आणि 'याई रे' या गाण्यांमुळे त्यांनी नव्या पिढीतही लोकप्रियता मिळवली.

## संगीताची आशा मावळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** "भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन," अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

आशा भोसले यांच्या निधनानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भावुक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. गायक महेश काळे यांनी सांगितले की, त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती मिळाल्यानंतरही अशी घटना घडेल, याची कल्पना नव्हती. गायक-संगीतकार सलील कुलकर्णी यांनी "आशाताईंशिवाय भारत आणि संगीतविश्वाची कल्पनाच करता येत नाही," अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

संगीतकार शंकर महादेवन यांनीही "त्यांच्या योगदानाचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. त्या आपल्या गाण्यांतून कायम जिवंत राहतील," असे म्हटले. अभिनेते अक्षय कुमार तसेच संगीतकार जोडी अजय-अतुल यांनीही सोशल मीडियावर श्रद्धांजली अर्पण केली. तसेच अभिजित सावंत, प्राजक्ता माळी, आस्ताद काळे यांसारख्या कलाकारांनीही शोक व्यक्त केला.

आशा भोसले यांनी अनेक दशकांपासून हिंदीसह विविध भाषांतील चित्रपटसृष्टीत आपला वेगळा ठसा उमटवला होता. त्यांच्या बहुआयामी गायकीमुळे त्या भारतीय संगीतविश्वातील अजरामर नाव ठरल्या. त्यांच्या निधनाने भारतीय संगीतसृष्टीतील एक युग संपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## सुनेत्रा पवारांकडून रणशिंग अजित पवारांची आठवण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती पोटनिवडणुकीसाठी प्रचाराचा नारळ फुटताच राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचार मोहिमेला औपचारिक सुरुवात करण्यात आली असून, बारामतीतून त्यांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

प्रचाराचा नारळ फोडण्याच्या कार्यक्रमात बोलताना सुनेत्रा पवार भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले. भाषणादरम्यान त्यांनी दिवंगत अजित पवार यांची आठवण काढत त्यांच्या कार्याचा उल्लेख केला. "दादांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करायचे आहे," अशा भावनेतून त्यांनी जनतेसमोर आपली भूमिका मांडली. या कार्यक्रमात राज्याच्या मंत्री आदिती तटकरे याही उपस्थित होत्या. भाषणादरम्यान अजित पवार यांच्या आठवणींमुळे त्या भावुक झाल्याचे चित्र दिसून आले.



बारामती मतदारसंघात पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध पक्षांकडून प्रचार यंत्रणा सक्रिय करण्यात येत आहे. सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराच्या प्रारंभानंतर आता पुढील काही दिवसांत मतदारसंघातील राजकीय घडामोडींना अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.

## एसआयआर मोहीमेचा मतदार यादीला मोठा फटका

# उत्तर प्रदेशात २ कोटींहून अधिक नावे वगळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर राज्याच्या मतदारसंख्येत लक्षणीय घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणूक आयोगाने राबवलेल्या विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेनंतर राज्यातील २ कोटींहून अधिक मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत, अशी माहिती अधिकृत आकडेवारीतून समोर आली आहे.



या प्रक्रियेनंतर उत्तर प्रदेशातील एकूण मतदारसंख्या आता सुमारे १३.३९ कोटी इतकी नोंदवण्यात आली आहे. मतदारयादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्याच्या उद्देशाने ही व्यापक मोहीम हाती घेण्यात आली होती.

एसआयआर प्रक्रियेअंतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत मोठ्या प्रमाणावर दुबार आणि अवैध नोंदी आढळून आल्या. त्यानुसार मतदारयादीतून खालील प्रकारची नावे हटवण्यात आली. मृत व्यक्तींची नोंद, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंदणी असलेले दुबार मतदार, दीर्घकाळापासून अनुपस्थित किंवा पत्त्यावर सापडू न शकलेले मतदार या छाननीनंतर राज्यातील मतदारयादी अधिक विश्वासार्ह आणि अद्ययावत करण्यात आल्याचा दावा निवडणूक आयोगाने केला आहे.

एसआयआर मोहीम ही केवळ उत्तर प्रदेशापुरती मर्यादित नसून देशातील अनेक राज्यांमध्ये टप्प्याटप्प्याने राबवण्यात आली. मात्र, या प्रक्रियेत सर्वाधिक नावे वगळली गेल्याची नोंद उत्तर प्रदेशात झाली आहे. सुमारे २.०४ कोटी नावे हटवली गेल्याने हा आकडा देशातील सर्वात मोठा ठरला आहे.

मतदारयादीतील एवढ्या मोठ्या प्रमाणातील बदलामुळे राजकीय वर्तुळात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काही ठिकाणी मतदारसंख्येतील घट निवडणूक गणितांवर परिणाम करू शकते, अशी चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः स्थानिक पातळीवरील मतदारसमिकरणे आणि बूथ व्यवस्थापनावर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाकडून ही संपूर्ण मोहीम पारदर्शक निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मतदारयादीतील त्रुटी दूर करून निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता वाढवण्याचा हा प्रयत्न असल्याचेही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरणात या आकडेवारीची जोरदार चर्चा सुरू असून पुढील निवडणुकांच्या तयारीवर याचा थेट परिणाम दिसू शकतो.

## ओएनजीसी सीईओंचा भारताला गंभीर इशारा

# तेल आणि गॅसचा प्रत्येक थेंब मौल्यवान!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संघर्ष काही काळासाठी थांबला असला तरी धोका पूर्णपणे टळलेला नाही, असा स्पष्ट इशारा तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ओएनजीसी)चे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी अरुणकुमार सिंग यांनी दिला आहे. इराण-अमेरिका-इस्रायल संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील दोन महिन्यांच्या नाकाबंदीच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.

दिल्लीतील एका कार्यक्रमात बोलताना सिंग म्हणाले की, आखाती देशांकडून ऊर्जा पुरवठा कायम सुरळीत राहील, असे गृहित धरणे चुकीचे आहे. "देशांतर्गत तेल आणि वायूच्या प्रत्येक थेंबाचे उत्पादन वाढवण्यासाठी भारताने सर्व शक्ती पणाला लावण्याची गरज आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले की, भविष्यात संकटाच्या काळात कोणताही देश मदतीसाठी पुढे येईलच, याची खात्री नाही. त्यामुळे भारताने बाह्य पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. आखाती देश जवळ आहेत आणि त्यांचे संसाधन सहज उपलब्ध राहील, ही धारणा मोठी चूक ठरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक जवळपास सहा आठवडे ठप्प झाल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीला मोठा धक्का बसला असल्याचेही त्यांनी नमूद केले. या घटनेमुळे अनेक दशकांतील सर्वात गंभीर ऊर्जा संकट निर्माण झाले असून, अशा परिस्थितीचा पूर्वी कुणी विचारही केला नव्हता, असे त्यांनी सांगितले.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे निम्मे, नैसर्गिक वायूच्या गरजेपैकी सुमारे ३० टक्के आणि एलपीजीच्या गरजेपैकी जवळपास ९० टक्के आयात मध्य-पूर्वेकडून करतो, हे वास्तवही त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे अशा भूराजकीय संकटांचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होतो, असे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर त्यांनी घरगुती स्वयंपाकासाठी पाइपद्वारे पुरवठा होणाऱ्या पीएनजी (पाइप्ड नॅचरल गॅस) प्रणालीला प्राधान्य देण्याचे समर्थन केले. तसेच जागतिक बाजारातील अनिश्चिततेमुळे रिफायनिंग मार्जिन अधिक अस्थिर झाल्याचेही त्यांनी नमूद केले. तरीही, सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीत भारताने ऊर्जा व्यवस्थापन प्रभावीपणे हाताळले असल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## डिझेलवरील निर्यात शुल्कात वाढ

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने हाय-स्पीड डिझेलवरील निर्यात शुल्कात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्राने डिझेलवर २४ रुपये प्रति लिटर निर्यात शुल्क आणि ३६ रुपये प्रति लिटर इन्फ्रा सेस वाढवलाय. यापूर्वी २६ मार्च रोजीही डिझेलवर २१.५० रुपये प्रति लिटर निर्यात शुल्क लावण्यात आले होते. आता ही रक्कम थेट ५५.५ रुपये प्रति लिटरपर्यंत वाढलीय. या निर्णयामुळे देशांतर्गत इंधनाची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे मानले जाते. मात्र, निर्यात शुल्कात वाढ झाल्याने, देशातील दरांवर कोणताही परिणाम होणार नाही तसेच देशातील उपलब्धता वाढेल, असे मानले जाते.

## १३ बांगलादेशी मुलींचे पलायन

### केअरटेकर, सुरक्षारक्षकावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** हडपसर परिसरातील महंमदवाडी रोडवरील रेस्क्यू फाउंडेशन संस्थेतून १३ बांगलादेशी मुलींनी केअरटेकर व सुरक्षारक्षकावर हल्ला करून पलायन केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून बेपत्ता मुलींचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संस्थेतून पलायन करण्यासाठी मुलींनी नियोजनपूर्वक डाव आखला होता. औषध घेण्याच्या बहाण्याने एका मुलीने केअरटेकर लक्ष्मी कांबळे यांना दरवाजा उघडण्यास सांगितले. दरवाजा उघडताच इतर मुलींनी त्यांच्यावर हल्ला करत तोंडात बोळा कोंबून हातपाय बांधले आणि त्यांना वैद्यकीय कक्षात कोंडून ठेवले. साफसफाईदरम्यान मुख्य दरवाजा उघडा राहिल्याचा फायदा घेत मुलींनी सुरक्षारक्षकावरही हल्ला केला. त्याला चावा घेऊन सर्वजणी तिथून पसार झाल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. सय्यदनगर आणि हडपसर परिसरात शोध घेत दोन मुलींना ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित ११ मुली अद्याप फरार आहेत. काळेपडळ पोलीस ठाणे यांच्याकडून पुढील तपास सुरू आहे.

रेस्क्यू फाउंडेशन ही संस्था मानवी तस्करीतून सुटका केलेल्या महिला व मुलींसाठी कार्यरत आहे. यापूर्वी संस्थेला पोलीस संरक्षण उपलब्ध होते; मात्र मार्च २०२४ मध्ये ते काढून घेण्यात आले. त्यानंतर संस्थेकडून पुन्हा संरक्षणाची मागणी करण्यात आली होती. संस्थेत क्षमतेपेक्षा अधिक महिला राहत असल्याची माहिती आहे. बांगलादेशी मुलींच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्यामुळे त्या तणावाखाली येत असल्याचे म्हटले जात आहे.

## वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस मंजुर; प्रवाशांची गैरसोय दूर

# पुणे-बेंगळुरू प्रवास आता १३ तासात होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे ते बेंगळुरू या महत्त्वाच्या रेल्वे मार्गावर आता प्रवाशांना प्रीमियम दर्जाचा रात्रीचा प्रवास अनुभव मिळणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी वंदे भारत एक्सप्रेस च्या स्लीपर आवृत्तीला मंजुरी दिली असून, ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते केएसआर बेंगळुरू सिटी जंक्शन दरम्यान धावणार आहे. या निर्णयामुळे पुणेकरांसह संपूर्ण मार्गावरील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. रेल्वे सूत्रांच्या माहितीनुसार, या मार्गावर दोन स्वतंत्र रेक उपलब्ध करून दिले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई आणि बेंगळुरू या दोन्ही





शहरांतून दररोज रात्री सेवा सुरू ठेवता येईल. सध्या या मार्गावर उद्यान एक्सप्रेस ही प्रमुख दैनंदिन गाडी असून तिला गंतव्यस्थानी पोहोचण्यासाठी सुमारे २१ ते २३ तास लागतात. याशिवाय कोयंबतूर एक्सप्रेस ही गाडी पुणे मार्गे धावते, तिला सुमारे १९ तासांपेक्षा अधिक वेळ लागतो. मात्र नवीन स्लीपर वंदे भारत गाडी हा प्रवास अवघ्या १३ तासांत पूर्ण करेल, त्यामुळे प्रवाशांचा किमान ५ ते ८ तासांचा वेळ वाचणार आहे. स्लीपर वंदे भारत गाडी ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून ती ताशी १८० किमी वेगाने धावण्यास सक्षम आहे. या गाडीत एकूण १६ डबे असतील आणि सुमारे ८२३ प्रवाशांची क्षमता असेल. विशेष म्हणजे, या गाडीत प्रवाशांच्या आरामाला प्राधान्य देण्यात आले आहे. यामध्ये एर्गोनॉमिक डिझाइनचे आरामदायी बर्थ, अत्याधुनिक शौचालये, प्रगत निर्जंतुकीकरण प्रणाली, कमी आवाजासाठी विशेष डिझाइन आणि विमानासारखा प्रीमियम प्रवास अनुभव देणारी सुविधा असेल. रात्रभर प्रवास करून सकाळी गंतव्यस्थानी पोहोचण्याची सोय असल्यामुळे ही सेवा व्यावसायिक, आयटी क्षेत्रातील कर्मचारी तसेच नियमित प्रवाशांसाठी उपयुक्त ठरणार आहे. मुंबई-बेंगळुरू मार्गावर पुणे हे महत्त्वाचे स्थानक असल्यामुळे पुण्यातील प्रवाशांनाही या सेवेचा थेट लाभ मिळणार आहे. कमी वेळेत, अधिक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याने या मार्गावरील रेल्वे प्रवासात मोठा बदल अपेक्षित आहे. ही गाडी देशातील दुसरी स्लीपर वंदे भारत सेवा ठरणार आहे. यापूर्वी हावडा–गुवाहाटी रेल्वे मार्ग मार्गावर पहिली स्लीपर वंदे भारत सुरू करण्यात आली आहे. आता मुंबई-बेंगळुरू हा देशातील अत्यंत महत्त्वाचा औद्योगिक व आयटी कॉरिडॉर या आधुनिक सेवेने जोडला जाणार आहे. रेल्वेमंत्र्यांनी ५ एप्रिल रोजी या प्रस्तावाला हिरवा कंदिल दाखवला असून, लवकरच ही गाडी प्रत्यक्ष रुळावर धावण्याची शक्यता आहे.

## स्कूल बसवाल्यांच्या मनमानीला चपराक !

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात स्कूल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. तर आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कडक आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६'लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून १५ दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

## संपादकीय

## अमेरिका की अनिश्चितता: शक्तीचा विस्कटलेला अर्थ



**महासत्ता म्हणून अमेरिकेची ओळख स्थैर्य, सातत्य आणि मूल्यांवर उभी राहिली. पण नेतृत्वच अनिश्चित झाले, तर ही ओळख ढासळते. आक्रमक वक्तव्ये आणि अचानक बदलणारी भूमिका यामुळे शक्ती टिकते; पण विश्वास डळमळतो आणि विश्वासच निर्णायक ठरतो.**

महासत्ता असणे म्हणजे केवळ ताकद नव्हे; ती कशी वापरली जाते, हे अधिक महत्त्वाचे. अमेरिका दीर्घकाळ या कसोटीवर उतरली. तिच्या धोरणांत सातत्य होते, निर्णयांत मोजमाप होते आणि शब्दांना वजन होते. म्हणूनच तिचे नेतृत्व मान्य झाले. पण जेव्हा शब्द आधी आणि विचार नंतर येतो, तेव्हा शक्तीचा अर्थ बदलतो. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली हे बदल अधिक ठळक दिसले. इराणविषयीची आक्रमक भाषा, उघड धमक्या आणि त्यानंतरची माघार ही शैली धोरणाची नसून अनिश्चिततेची आहे. धमकी आणि संवाद यामधील समतोल हा राजनयाचा गाभा असतो; तोच येथे विस्कटलेला दिसतो. परिणामी, अमेरिका मजबूत असूनही अस्थिर भासते. या अस्थिरतेचे परिणाम केवळ द्विपक्षीय संबंधांपुरते मर्यादित राहत नाहीत. जागतिक पातळीवर त्याचे पडसाद उमटतात. युरोप सावध होतो, पश्चिम आशियातील समीकरणे बदलतात, आणि जिथे अमेरिका कमी पडते तिथे इतर देश पुढे येतात. जागा रिकामी राहत नाही; ती भरली जाते. प्रश्न इतकाच, ती कोण भरतो? यात विरोधाभासही स्पष्ट आहे. एकीकडे अमेरिकेची लष्करी आणि आर्थिक ताकद अबाधित आहे; दुसरीकडे तिच्या निर्णयांतील अनिश्चितता तिच्याच प्रभावाला कमी करते. शक्ती टिकते; पण विश्वास ढासळतो. आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्वास हरवला, की शक्तीही मर्यादित होते. अमेरिकेची खरी ताकद तिच्या संस्थांमध्ये आहे, हेही विसरता येत नाही. न्यायव्यवस्था, माध्यमे, नागरी समाज या सर्वांनी सत्तेला प्रश्न विचारण्याची परंपरा जपली आहे. हीच लोकशाहीची ताकद आहे. पण बाह्य जगाला दिसते ते नेतृत्व. आणि नेतृत्वच जर अस्थिर वाटले, तर त्या प्रतिमेवर परिणाम होतो. याशिवाय, या अनिश्चिततेचा आणखी एक परिणाम म्हणजे धोरणांतील विसंगती. एका बाजूला आक्रमक राष्ट्रवाद, तर दुसऱ्या बाजूला आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज या दोन टोकांमध्ये अमेरिका अडकलेली दिसते. मित्रदेशांनाही स्पष्टता हवी असते; आणि तीच कमी पडते. ही स्थिती केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नाही. ती एका व्यापक प्रवृत्तीचे लक्षण आहे, लोकप्रियतेच्या राजकारणात धोरणांचा बळी जातो. तात्काळ परिणाम आणि जोरदार विधानांना प्राधान्य दिले जाते; दीर्घकालीन परिणामांकडे दुर्लक्ष होते. महासत्तेसाठी ही पद्धत धोकादायक ठरते. यात आणखी एक सूक्ष्म पण महत्त्वाचा बदल दिसतो—भाषेचा. राजनैतिक भाषेत संयम, संदर्भ आणि संकेत असतात. पण जेव्हा ती भाषा घोषणांमध्ये आणि धमक्यांमध्ये बदलते, तेव्हा संवादाची जागा संघर्ष घेतो. शब्द हे केवळ अभिव्यक्ती नसतात; ते धोरणाचा आरसा असतात. जर त्या आरशात अस्थिरता दिसली, तर जग त्यावर विश्वास ठेवत नाही. आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ करारांवर नव्हे, तर शब्दांवरही उभे असतात. म्हणूनच, महासत्तेची भाषा जितकी मोजकी आणि नेमकी, तितकीच ती प्रभावी ठरते. आज ती नेमकेपणा हरवताना दिसतो, आणि तेच खरे चिंतेचे कारण आहे. याच पार्श्वभूमीवर आणखी एक प्रश्न उभा राहतो. जर नेतृत्व सातत्याने बदलत राहिले, तर जागतिक व्यवस्थेतील स्थैर्य कोण राखणार? अमेरिका दीर्घकाळ 'अँकर' म्हणून ओळखली गेली. पण अँकरच हलू लागला, तर जहाजाचा तोल बिघडतो. आज अनेक देश पर्याय शोधू लागले आहेत, हे त्याचेच लक्षण आहे. मध्यपूर्वेतील तणाव, चीनचा वाढता प्रभाव, आणि युरोपची सावध भूमिका या सर्वांच्या छेदबिंदूवर अमेरिका उभी आहे. येथे स्पष्ट, संयमी आणि सातत्यपूर्ण धोरण अपेक्षित असते. त्याऐवजी अनिश्चितता दिसली, तर ती केवळ अमेरिकेची समस्या राहत नाही; ती जागतिक समस्या बनते. शेवटी, प्रश्न ट्रम्प यांचा नाही; प्रश्न अमेरिकेच्या भूमिकेचा आहे. कारण महासत्ता असणे म्हणजे केवळ शक्ती बाळगणे नव्हे, तर त्या शक्तीला विश्वासाची जोड देणे. शक्ती भीती निर्माण करू शकते; पण नेतृत्व विश्वासावर उभे राहते. आणि तोच आज सर्वाधिक ढासळताना दिसतो.

# युद्धकाळातील अर्थव्यवस्था: सोपे उपाय संपले

**» जागतिकीकरणामुळे संघर्ष टळतील, असा समज होता. पण वास्तवाने तो फोल ठरवला. युद्ध केवळ सीमांवर होत नाही; ते अर्थव्यवस्थांनाही हादरवते. अशा काळात कठीण, दीर्घकालीन निर्णय अपरिहार्य ठरतात आणि तीच नेतृत्वाची खरी कसोटी ठरते.**



जागतिकीकरणाचा पाया एका गृहितकावर उभा होता. परस्परावलंबन वाढले, की युद्ध कमी होईल, असा विश्वास होता. व्यापार, गुंतवणूक आणि पुरवठा साखळ्या देशांना इतके जोडून ठेवतील, की संघर्ष परवडणार नाही. पण हा समज आता मोडला आहे. वास्तवाने दाखवून दिले की आर्थिक संबंध युद्ध रोखत नाहीत; ते फक्त त्याची किंमत वाढवतात.

इतिहासाने जागतिकीकरणाच्या दोन मोठ्या लाटा पाहिल्या. पहिल्या लाटेत अमेरिका उभी राहिली. दुसऱ्यात चीन जगाचा कारखाना बनला. तिसऱ्या टप्प्यात भारतासाठी संधी होती. लोकसंख्या, तंत्रज्ञान आणि सुधारणा या सर्व बाबी अनुकूल होत्या. पण संधीपेक्षा संकटांचा काळ मोठा ठरला.

कोविडने पुरवठा साखळ्या विस्कटल्या. त्यानंतरच्या संघर्षांनी त्या अधिकच कमकुवत केल्या. ऊर्जा महागली, महागाई वाढली, स्थलांतरित कामगारांची हालचाल विस्कळीत झाली. हे तात्पुरते धक्के नव्हते; ही संरचनात्मक अडचण होती. अर्थव्यवस्थेचा गाभाच हादरला.

युद्धाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे पर्यायांची घट. सामान्य काळात सरकारांकडे अनेक मार्ग असतात. अनुदाने, करसवलती आणि खर्चवाढ यांचा वापर करता येतो. पण संघर्षाच्या काळात हे पर्याय संकुचित होतात. संसाधने मर्यादित असतात आणि अनिश्चितता प्रचंड असते. एक गोष्ट स्पष्ट होते. सोपे उपाय सर्वात आधी संपतात. ऊर्जेच्या बाबतीत हे प्रकर्षाने दिसते. आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांना किंमतींच्या चढउतारांचा थेट फटका बसतो. पुरवठा खंडित झाला, की उत्पादन थांबते. उत्पादन थांबले, की रोजगारावर परिणाम होतो. आणि रोजगार ढासळला, की वाढही थांबते. ही साखळी एकदा तुटली, की तिची किंमत सर्वांनाच मोजावी लागते.

याच पार्श्वभूमीवर धोरणांचे स्वरूप बदलते. अल्पकालीन दिलासा द्यायचा की दीर्घकालीन स्थैर्य साधायचे, हा मूलभूत प्रश्न उभा राहतो. दोन्ही एकाच वेळी साधणे कठीण ठरते. म्हणून प्राधान्यक्रम ठरवावे लागतात. इथेच नेतृत्वाची खरी परीक्षा होते. भारतासाठी हा क्षण निर्णायक आहे. संकट सहन करू शकणारी अर्थव्यवस्था उभी करणे ही आता गरज आहे. पुरवठा साखळ्यांचे विविधीकरण, ऊर्जा स्रोतांचा विस्तार आणि वित्तीय शिस्त या गोष्टी अनिवार्य ठरल्या आहेत. पण हे निर्णय सहज नाहीत. त्यासाठी वेळ, गुंतवणूक आणि सातत्य लागते. राजकारणाला तात्काळ परिणाम हवेत; अर्थव्यवस्थेला संयम हवा असतो. या संघर्षात दीर्घकालीन हित अनेकदा मागे पडते. आणि तेच पुढे जाऊन महागात पडते.

युद्धाने आणखी एक बदल घडवला आहे. मुक्त व्यापाराच्या जागी सुरक्षिततेचा विचार पुढे आला आहे. स्वस्ततेपेक्षा स्थैर्य महत्त्वाचे ठरू लागले आहे. भारतासाठी ही संधी आहे. उत्पादन वाढवण्याची, स्वावलंबन मजबूत करण्याची. पण हीच एक मोठी परीक्षा देखील आहे. धोरणात्मक स्पष्टता आता अपरिहार्य झाली आहे. अर्धवट उपाय चालत नाहीत. ऊर्जा, शेती आणि वित्त या क्षेत्रांत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अनुत्पादक अनुदाने कमी करणे, तोट्यातील व्यवस्थांचे पुनर्रचना करणे या गोष्टी टाळता येणार नाहीत.

यासोबत आर्थिक शिस्तही महत्त्वाची ठरते. संघर्षाच्या काळात खर्च वाढवणे सोपे असते; पण त्याचे परिणाम दीर्घकालीन असतात. कर्ज वाढते, चलनावर दबाव येतो आणि धोरणांची लवचिकता कमी होते. त्यामुळे प्रत्येक निर्णय अधिक जबाबदारीने घ्यावा लागतो. आजचा दिलासा आणि उद्याचे स्थैर्य यामधील संतुलन साधणे हीच खरी कसोटी आहे. शेवटी प्रश्न एकच आहे. भारत कठीण निर्णय घेण्यास तयार आहे का?

कारण संघर्षाच्या काळात सोपे उपाय नसतात. आणि जेव्हा सोपे उपाय संपतात, तेव्हा नेतृत्व उघडे पडते.

## स्त्रीशिक्षणाचा विचार आजही मार्गदर्शक

### क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी रुजवलेला स्त्रीशिक्षणाचा विचार आजही समाजाला दिशा देणारा असून, तोच आधुनिक भारताच्या प्रगतीचा पाया आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त मुख्य प्रशासकीय भवन तसेच पिंपरी येथील सावित्रीबाई फुले स्मारकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापौरांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.



महापौर लांडगे म्हणाले की, स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजपरिवर्तनाची नवी दिशा दिली. आज महिलांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे त्यांच्या विचारांचेच फलित आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त 'सामाजिक समता सप्ताह' आणि 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत पिंपरी येथील सावित्रीबाई फुले स्मारकात विशेष छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

११ ते १५ एप्रिलदरम्यान सुरू असलेल्या या प्रदर्शनात महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी प्रसंगांचे दुर्मिळ छायाचित्रांद्वारे दर्शन घडवण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या विचारांचा जवळून परिचय व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अतिरिक्त पाणीकपात नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात सध्या दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा सुरू असून, यापुढे अतिरिक्त पाणीकपात करण्यात येणार नाही, अशी स्पष्ट माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरासाठी सुमारे १५ टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, शहरात गेल्या सव्वासहा वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू असल्याने नव्याने अतिरिक्त कपात लागू केली जाणार नाही, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

दरवर्षी ३१ जुलैपर्यंत पिण्याच्या पाण्याचा साठा राखीव ठेवला जातो. यंदा पावसाचे अनिश्चित चित्र पाहता हा कालावधी ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आला आहे. पाणीकपातीमुळे वाचवलेला साठा पुढील काही महिन्यांत शहरवासीयांना उपयोगी पडणार आहे. शहराला पवना धरण तसेच आंद्रा धरणातून इंद्रायणी नदीच्या निघोजे बंधाऱ्यातून पाणी उचलून पुरवठा केला जात आहे. जलसंपदा विभागाच्या निर्देशांपूर्वीच शहरात काटकसरीचा पुरवठा सुरू असल्याने परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. महापालिकेकडून प्रक्रिया केलेले पाणी नदीपात्रात न सोडल्याने जलसंपदा विभागाने दंड ठोठावला आहे. या दंडाची रक्कम भरण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहितीही आयुक्तांनी दिली.

## शहरात उन्हाचा चटका वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागली असून शनिवारी तापमान तब्बल ३८ अंश सेल्सिअस नोंदविले गेले. वाढत्या उष्म्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे.

सकाळी नऊ वाजल्यानंतरच उन्हाचा चटका जाणवू लागतो, तर दुपारच्या सुमारास उष्णतेचा तडाखा अधिक तीव्र होत आहे. गेल्या आठवड्यात उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला होता; मात्र पुन्हा तापमानाचा पारा वाढल्याने नागरिकांना बाहेर पडणे टाळावे लागत आहे.

घर आणि कार्यालयांमध्ये पंखे, कुलर आणि एसीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असून विजेची मागणीही वाढल्याचे चित्र आहे. उष्णतेपासून बचावासाठी नागरिक सुती कपडे, गॉगल, टोपी यांचा वापर करत आहेत.

दरम्यान, उन्हाळ्यामुळे बाजारपेठेतही बदल दिसून येत आहे. रस्त्यांवर उसाचा रस, लिंबू सरबत, फळांचे ज्यूस, ताक आणि पन्हे विकणाऱ्या स्टॉल्सची संख्या वाढली आहे. फळ बाजारात कलिंगड आणि खरबूज यांना मोठी मागणी असून डेअरीवर दही, लस्सी आणि ताकासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

उष्माघात टाळण्यासाठी नागरिक रसदार फळे, भाज्या आणि थंड पेयांचे सेवन करत असल्याचे दिसून येत आहे. तज्ज्ञांकडून दुपारच्या कडाक्याच्या उन्हात बाहेर पडणे टाळावे आणि पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला दिला जात आहे.

## नव्या प्रशासकीय इमारतीला गती देण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत ही नागरिकांसाठी आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा केंद्र ठरणार असल्याने प्रकल्पाची गुणवत्ता राखत तो निर्धारित वेळेत पूर्ण करावा, अशा स्पष्ट सूचना महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या.

चिंचवड येथील सायन्स पार्क परिसरात उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची महापौरांनी प्रत्यक्ष पाहणी करत सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी गुणवत्ता, वेळापत्रक आणि समन्वय याबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.



महापौर लांडगे म्हणाले की, शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन उभारली जाणारी ही इमारत नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवा जलद आणि सोयीस्कर पद्धतीने उपलब्ध करून देईल. त्यामुळे प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता अबाधित राखणे आणि कोणतीही तडजोड न करता काम पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत माहिती देताना सांगितले की, काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून गुणवत्ता, सुरक्षा आणि वेळेचे काटेकोर पालन केले जात आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनीही कामाच्या विविध टप्प्यांची माहिती सादर करत प्रकल्पाची सध्याची प्रगती आणि पुढील नियोजन मांडले. या पाहणीदरम्यान नगरसेवक, अधिकारी आणि संबंधित विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट कागदपत्रांद्वारे ७५ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** रावेत परिसरात बनावट कागदपत्रांच्या आधारे तब्बल ७५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गुलाब तुकाराम भोंडवे (वय ६०, व्यवसाय – शेती, रा. रावेत) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी संदीप शिवाजी भोंडवे (रा. रावेत) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, आरोपीने २८ मे २०२१ रोजी बनावट विसारपत्र (नोटरी दस्त) तयार करून फिर्यादीच्या मालकीची स. नं. १०३/३+३ब मधील सुमारे ११८ गुंठे जमीन व्यवहारात असल्याचे खोटे भासवले. या प्रक्रियेत फिर्यादीसह इतरांच्या बनावट सह्या करून कागदपत्रे तयार करण्यात आल्याचे समोर आले आहे.

यानंतर आरोपीने सुहास गोलांडे, दिलीप सोहनराज जैन आणि भावेश भागचंद सोनिगरा यांची फसवणूक करत करारनाम्याच्या माध्यमातून एकूण ७५ लाख रुपये उकळल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच, या व्यवहारात मनिष जैन यांच्याकडून घेतलेले २० लाख रुपये परत न करता आरोपीने ते स्वतःकडेच ठेवून आणखी फसवणूक केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३३९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रावेत पोलीस करत आहेत.

### कौटुंबिक वादातून महिलेला मारहाण

**पुणे:** पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात कौटुंबिक वादातून एका महिलेवर मारहाण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पती आणि सासूविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, दोन्ही आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास खेड तालुक्यातील चऱ्होली बुद्रुक परिसरात घडली. याप्रकरणी २८ वर्षीय पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, मुलीच्या शिक्षणाच्या फीवरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर पुढे तीव्र भांडणात झाले. संतापलेल्या पतीने महिलेला शिवीगाळ करत घरातील काठीने मारहाण केली. या मारहाणीत तिच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाल्याचे सांगण्यात आले आहे.

या घटनेदरम्यान सासूनेही हस्तक्षेप करत महिलेला थप्पड मारून मारहाण केली. तसेच "तू या घरात राहू नकोस" असे सांगत तिला घराबाहेर काढल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### आळंदी परिसरात दरोड्याची तयारी उधळली

**पिंपरी :** आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याची तयारी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश करत पाच आरोपींना अटक केली आहे. या टोळीत तीन अल्पवयीन मुलांचाही सहभाग असल्याचे उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. ही कारवाई १० एप्रिल रोजी पहाटे धानोरे गावाच्या हद्दीत आळंदी–मार्कळ रोडवरील एका कंपनीसमोर करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी पोलीस हवालदार संदीप लक्ष्मण दोडके (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये महमद इब्राहिम अनिस चौधरी (१९), जिशान महमद सहिर सय्यद खान (१८), जमाल आशिक अली हाशमी (१९), शिवकुमार निरंजन चौव्हाण (१९) आणि सलमान जुबेर बागवान (१८) यांचा समावेश आहे.

## नदीकाठावर बेकायदेशीर माती टाकणाऱ्यांविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवड परिसरात पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण करणारा प्रकार उघडकीस आला आहे. पवना नदीच्या काठावर बेकायदेशीररित्या माती टाकून नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी गुन्हा क्रमांक १३९/२०२६ नोंदविण्यात आला असून, आरोपींवर जलप्रदूषण प्रतिबंधक कायदा १९७४, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, तसेच महापालिका कायदा आणि भारतीय दंड संहितेतील विविध कलमांनुसार कारवाई सुरू आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी पंकज सुधाकर धेंडे (वय ३७) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, १ मार्च ते १० एप्रिल या कालावधीत चिंचवड येथील एका लॉन्ससमोर मोठ्या प्रमाणात माती टाकण्यात आली. यामुळे पवना नदी आणि शेजारील नैसर्गिक नाल्याची रुंदी कमी झाली असून, नैसर्गिक जलप्रवाहात अडथळा निर्माण झाला आहे. परिणामी पर्यावरणीय हानीसह सार्वजनिक उपद्रव निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. खंडू दामू चिंचवडे आणि धनंजय खंडू चिंचवडे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पत्रकार प्रफुल्ल टंकसाळे यांचे निधन



**चाकण :** खेड तालुका पत्रकार संघाच्या सोशल मीडिया विभागाचे तालुका अध्यक्ष तथा पत्रकार प्रफुल्ल चंद्रकांत टंकसाळे (वय ४५) यांचे अल्पशा आजाराने पुण्यातील बाणेर येथील खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चाकण येथील चक्रेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. टंकसाळे हे चाकण रेस्क्यू टीम, प्राणी मित्र संघटना तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागासाठी ओळखले जात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, भाऊ असा परिवार आहे.

### पोकलेन मशिन रस्त्यावर कोसळले

**उरुळी कांचन :** उरुळी कांचन–जेजुरी रस्त्यावरील शिंदवणे घाटात जेजुरीकडे जाणाऱ्या कंटेनरमधून पोकलेन मशीन निसटून रस्त्यावर कोसळल्याची घटना शनिवारी (ता. १२) मध्यरात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने रात्रीची वेळ असल्याने मोठा अपघात टळला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर पोकलेन मशीन घेऊन घाटातून जात होता. घाटातील तीव्र वळणावर मशीनचे संतुलन बिघडल्याने ते थेट रस्त्यावर पडले. अवजड यंत्र कोसळल्याने मोठा आवाज झाला आणि परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटना मध्यरात्री घडल्यामुळे घाटात वाहनांची वर्दळ कमी होती. हीच घटना दिवसा किंवा गर्दीच्या वेळी घडली असती, तर गंभीर अपघाताची शक्यता होती. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. दरम्यान, रस्त्यावर मशीन पडल्याने काही काळ वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता.

## महात्मा फुले जयंती निमित्ताने आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पुष्पहार

# महात्मा फुले-सावित्रीबाईंचा पूर्णाकृती पुतळा उभारणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** शहरात योग्य जागा उपलब्ध करून दिल्यास क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल, अशी घोषणा खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी केली. तालुक्याच्या वैभवात भर घालणारे दर्जेदार स्मारक उभारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

राजगुरुनगर येथे येथे महात्मा फुले जयंती निमित्ताने पंचायत समितीच्या आवारात आलेल्या महात्मा फुले यांच्या अर्ध पुतळ्यास आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन खेड तालुका समता परिषदेच्या वतीने करण्यात आले होते यावेळी खेड पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, सहाय्यक गटविकास अधिकारी भोईर, व्याख्याते संपत गारगोटे, राजगुरुनगर नगर परिषदेचे अध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरसेवक वैभव घुमटकर, नगरसेविका सुप्रिया घुमटकर, राजगुरुनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामदास धनवटे, समता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष शांताराम घुमटकर, डॉ शेखर घुमटकर, विनायक घुमटकर, जिर शिंदे, प्रकाश पाचारणे, सारिका घुमटकर, डॉ सरिता घुमटकर, सतीश चांभारे, डॉ.सीमा घुमटकर, विलास भास्कर, अशोक कडलक, ज्योती चव्हाण, वैभव नाईकरे, गणेश घुमटकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

शिवव्याख्याते संपत गारगोटे म्हणाले, देशातले खरे महात्मा फुले आहेत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जनतेपुढे आणला. महात्मा फुले यांनी पहिली शिवजयंती साजरी केली. त्यांनीच महाराजांवर पहिला पोवाडा लिहला होता. महात्मा फुले यांचे देशासाठी सर्वांत मोठे योगदान आहे. मुलींसाठी त्यांनी पहिली शाळा काढली. महात्मा फुले यांचे विचार केवळ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयांनी अवगत केले आहेत. महात्मा फुले यांचे नाव म्हणजे आधुनिक भारत आहे, असेही गारगोटे म्हणाले.

खेड पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते म्हणाल्या, सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केल्याने आज त्यांच्या पुण्याईमुळे मला सभापती पदावर पोहचता आले. महिलांना शिक्षण देण्यासाठी सावित्रीबाई फुले यांना अनेक संकटे आणि आव्हानांना तोंड द्यावे लागले. मात्र त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी न डगमगता सामना केला. त्यांच्या मागे महात्मा ज्योतिबा फुले ठाम पणे उभे होते. एका पुरुषाच्या यशामागे जशी त्याच्या पत्नीची साथ असते, तशीच एका स्त्रीच्या मागे तिच्या नवऱ्याचा मोठा आधारस्तंभ ठामपणे उभा असतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी ज्योती चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कैलास मुसळे यांनी केले.

## मोहिनी सुरवसेची महसूल सहाय्यक पदावर निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** लोणी येथील मोहिनी मारुती सुरवसे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महसूल सहाय्यक पदावर निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्दीने अभ्यास करून तिने हे यश संपादन केले.

मोहिनीचे आई-वडील बांधकाम मजूर असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती मर्यादित आहे. तरीही शिक्षणाची जिद्द कायम ठेवत तिने स्पर्धा परीक्षेत यश मिळवले. तिचा मोठा भाऊ करण सुरवसे याने यापूर्वी स्पर्धा परीक्षेद्वारे भारतीय टपाल विभागात नोकरी मिळवली आहे, तर धाकटी बहीण पुण्यात अभियांत्रिकी शिक्षण घेत आहे.

या यशा विषयी मोहिनीशी संपर्क साधला असता यापुढे मी आयएएस व आयपीएस साठी प्रयत्न करणार असून यूपीएससी आणि एमपीएससी या स्पर्धापरीक्षा देण्यासाठी साठी प्रयत्न करत आहे असे सांगितले. माझे वडील मारुती सुरवसे, आई सुरेखा सुरवसे, मोठा भाऊ करण सुरवसे, आतेभाऊ बांधकाम व्यवसायिक लाला सूर्यवंशी व भारतीय सेनेमध्ये कार्यरत असलेले राहुल सूर्यवंशी यांना यशाचे श्रेय देत आहे.

मोहिनीच्या निवडीबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाळुंज, माजी विद्यार्थी प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह वाळुंज पाटील, महसूल विभागाचे सहसचिव डॉ. कैलासराव गायकवाड तसेच समाजभूषण कैलासराव गायकवाड यांनी अभिनंदन करून तिचे कौतुक केले आहे.

## खेडच्या आदिवासी भागासाठी ५ कोटींचा निधी; पाणी, रस्ते, वीज कामांना गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरूनगर :** खेड तालुक्यातील आदिवासी वाडी-वस्त्यांच्या विकासासाठी पाणी, रस्ते आणि वीज या मूलभूत सुविधांसाठी ५ कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार बाबाजी काळे यांनी दिली. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना २०२५-२६ अंतर्गत विविध कामांना प्राधान्य देत हा निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

आदिवासी भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. भोमाळे चिराचा ओढा येथे ३७ लाख रुपये खर्चून साठवण बंधारा उभारण्यात येणार आहे, तर खरपुड म्हसेवाडी येथे ४२ लाखांचा बंधारा आणि कारकुडी येथे ७६ लाख ५० हजार रुपयांचा कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा उभारला जाणार आहे.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत रस्ते सुधारणेसाठी भोरगिरी, आडगाव, देशमुखवाडी, बिबी-गुंडाळवाडी, शेलू, पांगरी-बुट्टेवाडी आणि दोंदे येथे एकूण ८२ लाख ४५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रेटवडी येथे २० लाख रुपये खर्चून सभामंडप उभारण्यात येणार आहे. आदिवासी किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रस्त्यांसाठी नायफड-सरेवाडी, नायफड-नाव्हाचीवाडी आणि कुडे बु ते बांगरवाडी या मार्गांसाठी एकूण १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तसेच आव्हाट येथील शेरेवाडी येथे ७१ लाख ५८ हजार रुपये खर्चून साकव उभारण्यात येणार आहे.

वीज सुविधांसाठीही ७८ लाख ९२ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून कारकुडी, शेंदूर्ली, धुओली, मांदोशी, भिवेगाव, धामणगाव, डेहणे, नायफड, भोमाळे आणि पाभेसाठी येथे कामे केली जाणार आहेत. या सर्व विकासकामांमुळे आदिवासी भागातील पायाभूत सुविधा मजबूत होणार असून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे 'ज्योतिर्लिंग पुरस्कार' प्रदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही चार दिवसांचा महारुद्र स्वाहाकार व अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी मान्यवरांना 'ज्योतिर्लिंग पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

संपूर्ण विश्वाच्या सुख-समृद्धी व शांततेसाठी भीमाशंकर ग्रामस्थ व रुद्र स्वाहाकार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने संतत जलधारा, रुद्राभिषेक, रुद्र स्वाहाकार आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. याबाबत माहिती देताना भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे यांनी सांगितले की, १ एप्रिल १९७९ पासून या परंपरेला सुरुवात झाली असून यंदा या उपक्रमाचे ४८ वे वर्ष आहे.

सन २०११ पासून ब्रह्मश्री श्रौताचार्य काशिनाथ भट्ट महाबळेश्वरकर गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'ज्योतिर्लिंग पुरस्कार' दिला जातो. वैदिक आणि वारकरी संप्रदायात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

यंदा हा पुरस्कार बोरी (ता. जुन्नर) येथील ह.भ.प. राजाराम महाराज शिवाजी जाधव, नाशिक येथील वेदमूर्ती स्मार्त चुडामणी पं. शांताराम शास्त्री भानोसे, तसेच भीमाशंकर येथे विशेष सेवा बजावणारे आचार्य रघुनाथ दामोदर पंढरपुरे यांना प्रदान करण्यात आला. हा सन्मान माँ शारदा प्रबोधिनीचे अध्यक्ष पांडुरंग महाराज येवले, बालयोगी अर्जुन नाथ महाराज आणि देवस्थानचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावर्षी रुद्र स्वाहाकारासाठी प्रसाद मधुकर शास्त्री गवांदे व केतकी प्रसाद गवांदे हे यजमान म्हणून सहभागी झाले होते. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात विकासकामे सुरू असल्याने यंदाचा सोहळा साध्या पद्धतीने, स्थानिक ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमास बालयोगी अर्जुन नाथ महाराज, पांडुरंग महाराज येवले, वेदमूर्ती मधुकरशास्त्री गवांदे, चंद्रकांत कौदरे, दत्तात्रय कौदरे, गोरक्ष कौदरे, संदीप कौदरे, रत्नाकर कोडिलकर, ह.भ.प. चिंतामण महाराज भारमळ, समीर कोडिलकर, विनायक कोडिलकर, राहुल कोडिलकर, संतोष गवांदे, संतोष कोडिलकर, ह.भ.प. सुदाम महाराज पवार, विजय कौदरे, बुधाजी डामसे, शांताराम लोहकरे, ह.भ.प. शांताराम महाराज आनंदराव, संतोष कानसकर, सचिव अशोक काशिद आदी उपस्थित होते.

## मानवाधिकार आयोगाच्या निरीक्षकांची भेट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला राष्ट्रीय मानवाधिकार आयोगच्या विशेष निरीक्षक डॉ. पूनम मलकोंडैया यांनी ८ एप्रिल २०२६ रोजी भेट देऊन शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेतील भौतिक सुविधा, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शालेय पोषण आहार योजना, क्रीडांगण, संगणक प्रयोगशाळा तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता यांचा सखोल आढावा घेतला.

शाळा आणि अंगणवाडी केंद्राच्या पाहणीसाठी आलेल्या डॉ. मलकोंडैया यांचे विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाद्वारे स्वागत केले. यावेळी लाठीकाठी आणि कराटेच्या प्रात्यक्षिकांनी त्या प्रभावित झाल्या. त्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रगतीची माहिती घेतली आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही प्रतिसादाचे कौतुक केले. या भेटीदरम्यान पुणे जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारी अस्मा मोमीन, गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका, बाल विकास प्रकल्प अधिकारी कुलदीप जाधव यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष पोखरकर यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचे आणि ग्रामस्थांच्या सहभागाचे कौतुक करत डॉ. मलकोंडैया यांनी विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा दिल्या.

## सत्यशोधक चळवळीत ओतूरचे मोठे योगदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** सत्यशोधक समाजाच्या चळवळीत ओतूर गावाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे प्रतिपादन डॉ. रमेश गोपाळे यांनी केले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवारी (दि. ११) महान समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. के. डी. सोनावणे उपस्थित होते.

यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्त्री शिक्षण, शूद्र-अतिशूद्रांच्या हक्कांसाठी लढा आणि सामाजिक समतेचा संदेश देणारे त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

डॉ. गोपाळे यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा फुले हे सेंद्रिय बुद्धिवंत होते, असे सांगितले. त्यांच्या विचारांवर थॉमस पेन, संत कबीर, लहुजी वस्ताद साळवे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. समाजातील वंचित घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य त्यांनी केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेही त्यांच्या विचारांनी प्रेरित झाले होते, असे त्यांनी सांगितले. सत्यशोधक चळवळीत ओतूर गावाचा ठसा उमटला असून कै. भाऊ कोंडाजी डुंबरे हे महात्मा फुले यांचे कट्टर समर्थक होते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. सुवर्णा डुंबरे यांनी केले, तर आभार युवराणी सोनवणे यांनी मानले.

## कलगीतुऱ्यांची नवचैतन्याने भरारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** ग्रामीण भागात सध्या ग्रामदैवतांच्या यात्रा-जत्रांचा हंगाम सुरू असून गावोगावी कलगीतुऱ्यांचे सामने रंगतदार वातावरण निर्माण करत आहेत. पारंपारिक लोककलेचा हा प्रकार असलेल्या शाहीरी सामन्यांना ग्रामीण संस्कृतीत विशेष स्थान असून, नव्या पिढीच्या सहभागामुळे या कलेला नवचैतन्य मिळताना दिसत आहे.

कलगीतुऱ्यांच्या सामन्यांमध्ये हरिविजय, रामायण, शिवपुराण, महाभारत, पांडवप्रताप, संतचरित्र आदी पौराणिक व ऐतिहासिक कथांवर आधारित प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून शाहीर आपली कला सादर करतात. या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन तर होतेच, शिवाय ज्ञान, संस्कार आणि इतिहास जपण्याचे कार्यही पार पडते.

एकेकाळी डफ, ढोलकी, तुनतूणे या पारंपारिक वाद्यांच्या साथीने सादर होणारे हे सामने आता काळानुसार बदलताना दिसत आहेत. प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन शाहीर मंडळींनी सादरीकरणात नावीन्य आणले आहे.

पारंपारिक वाद्यांसोबत आता ऑक्टोपॅड, ऑर्गन, की-बोर्ड यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वापर सुरू झाला आहे. आधुनिक गाण्यांच्या चालींवर शाहीर स्वतःच्या शैलीत सादरीकरण करत असल्याने या कार्यक्रमांची रंगत वाढली असून तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहे.

दरम्यान, जुन्नर तालुक्यातील गुळुंचवाडी येथील तरुण शाहीर ठकसेन शिंदे यांनी कलगीतुऱ्यात इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वापर करून नव्या प्रयोगाची सुरुवात केली. त्यांच्या या प्रयोगाला मिळालेल्या प्रतिसादामुळे इतर शाहीर मंडळ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. काही वर्षांपूर्वी ही लोककला नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची भीती व्यक्त होत होती. मात्र तरुण शाहिरांच्या पुढाकारामुळे आणि आधुनिक तंत्राच्या वापरामुळे कलगीतुरा पुन्हा नव्या उमेदीने उभा राहत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

## चाकण बाजारभाव : एकूण उलाढाल ६ कोटी २० लाख रुपये

# मिरची, कांदा, बटाटा व शेवग्याची भरपूर आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये हिरवी मिरची, कांदा, बटाटा व शेवग्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली. फळभाज्या व पालेभाज्यांची उच्चांकी आवक होऊनही भाव कडाडले आहेत. गुरांच्या बाजारात गाई, बैल व शेळ्यांची संख्या घटल्याचे दिसून आले. एकूण उलाढाल ६ कोटी २० लाख रुपये झाली.

चाकण बाजारात कांद्याची आवक वाढून एकूण १२ हजार ५०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल १,२०० रुपये भाव मिळाला. बटाट्याची आवक १,५०० क्विंटल झाली असून त्याला कमाल १,२०० रुपये भाव मिळाला. लसणाची आवक ३० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीची आवक ३५४ क्विंटल झाली असून तिला ४,००० ते ५,००० रुपये दर मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे – कांदा : आवक १२,५०० क्विंटल; भाव १,२००, ९००, ७०० रुपये. बटाटा : आवक १,५०० क्विंटल; भाव १,२००, ८००, ५०० रुपये.

फळभाज्या : टोमॅटो ३३० क्विंटल (८०० ते १,३०० रुपये), कोबी २३३ क्विंटल (४०० ते ६०० रुपये), फ्लॉवर २१० क्विंटल (८०० ते १,२०० रुपये), वांगी ९३ क्विंटल (१,००० ते १,५०० रुपये), भेंडी ९३ क्विंटल (२,००० ते ३,५०० रुपये), दोडका ६० क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), कारली ६८ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), दुधीभोपळा ४० क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), काकडी ९१ क्विंटल (१,००० ते १,६०० रुपये), फरशी २० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), वालवड ३८ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची १४८ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), चवळी ४२ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), वाटाणा ३५ क्विंटल (४,००० ते ५,५०० रुपये), शेवगा ३८ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), गाजर १२५ क्विंटल (१,००० ते १,५०० रुपये), गवार ४२ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रुपये)

पालेभाज्या : मेथी १३,५४० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये प्रति शेकडा), कोथिंबीर २१,५६५ जुड्या (८०० ते १,२०० रुपये), शेपू ३,०५४ जुड्या (८०० ते १,२०० रुपये), पालक ३,४९० जुड्या (४०० ते ८०० रुपये).

जनावरे : बाजारात आलेल्या ३५ जर्सी गाईंपैकी ३० गाईंची विक्री झाली (१५,००० ते ७०,००० रुपये). ७५ बैलांपैकी ६५ बैलांची विक्री झाली (१०,००० ते ४०,००० रुपये). ९० म्हशींपैकी ७५ म्हशींची विक्री झाली (३०,००० ते ८०,००० रुपये).

## झेंडूचे दर उतरल्याने फूल उत्पादक शेतकरी अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, वाळुंजनगर आणि लाखणगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर झेंडू फुलांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, सध्या झेंडूच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान आणि कमी झालेले दर या दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

मार्च-एप्रिल महिन्यात लग्नसराई, यात्रा आणि सण-उत्सवांचा हंगाम असल्याने फुलांना चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, प्रत्यक्षात बाजारभाव कोसळल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे.

आधीच कांद्याच्या दरघटीमुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला होता. त्यातून फुलांच्या उत्पन्नातून काहीसा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र झेंडूचे दरही घसरल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अडचण अधिकच वाढली आहे. सध्या झेंडूला प्रतिकिलो केवळ १० ते २० रुपये दर मिळत असून, इतर फुलांनाही समाधानकारक भाव मिळत नाहीत. १ तारखेला झालेल्या अवकाळी पावसामुळे झेंडू पिकांवर रोगराई वाढली आहे. त्यामुळे औषध फवारणीचा खर्च वाढला असून, तो परवडत नसल्याचे सांगण्यात आले.

## सारांश वृत्त

### उल्फाशी संबंधित सात जणांना अटक

**तिनसुकिया:** बंदी घातलेल्या उल्फा (आय) या दहशतवादी गटाशी संबंध असल्याच्या आरोपावरून सात जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. गुप्त माहितीच्या आधारे आसामच्या तिनसुकिया जिल्ह्याच्या आणि शेजारील अरुणाचल प्रदेशाच्या विविध भागांतून ही अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. हे लोक बंडखोरांना रसद पुरवण्याचे काम करत होते.

### तोतया आयबी अधिकाऱ्याला अटक

**गयाजी (बिहार)** : आयबी अधिकारी असल्याचे भासवणाऱ्या एका व्यक्तीला बिहारमधील गयाजी रेल्वे स्थानकावरून अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. शनिवारी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) आणि शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी) यांनी केलेल्या संयुक्त कारवाईदरम्यान ही अटक करण्यात आली, असे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. "संयुक्त पथकाने एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले, ज्याने चौकशी केल्यावर स्वतःची ओळख इंटेलिजन्स ब्युरो (आयबी) चा कनिष्ठ तपास अधिकारी म्हणून दिली आणि तो रेल्वे परिसरात अनधिकृत कारवायांमध्ये गुंतलेला आढळला," असे त्यात पुढे म्हटले आहे.

### खैबर पख्तुनख्वा प्रांतामध्ये पाकी जवानाचा मृत्यू

**इटानगर** : पश्चिम पेशावर पाकिस्तानच्या वायव्येकडील खैबर पख्तुनख्वा प्रांतातील एका सुरक्षा चौकीजवळ झालेल्या स्फोटात किमान एक सुरक्षा कर्मचारी ठार झाला आणि पाच जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री उशिरा बन्नू जिल्ह्यातील एका पदवी महाविद्यालयालगतच्या तपासणी नाक्याजवळ अज्ञात दहशतवाद्यांनी स्फोटकांचा स्फोट घडवला. एक सैनिक जागीच ठार झाला, तर एका नागरिकासह पाच जण जखमी झाले.

## २१ तासांच्या उच्चस्तरीय चर्चेत कोणताही ठोस करार नाही

# अमेरिका–इराण यांच्यातील चर्चा निष्फळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या तब्बल २१ तासांच्या उच्चस्तरीय चर्चेला कोणताही ठोस करार न होता पूर्णविराम मिळाला आहे. या चर्चेनंतर इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी स्पष्टपणे सांगितले की, वाटाघाटीदरम्यान वॉशिंग्टनला तेहरानचा विश्वास संपादन करता आला नाही.

गालिबाफ यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, इराणी शिष्टमंडळाने रचनात्मक भूमिका घेतली होती; मात्र समोरच्या बाजूने अपेक्षित विश्वासार्हता दाखवली नाही. त्यामुळे चर्चेची ही फेरी निष्फळ ठरल्याचे त्यांनी सूचित केले. या चर्चेत अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धजन्य तणाव कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तथापि, कोणताही करार न झाल्याने पश्चिम आशियातील परिस्थिती अद्याप अनिश्चितच आहे. तरीही तात्पुरता युद्धविराम कायम राहील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी चर्चेनंतर सांगितले की, वॉशिंग्टनने इराणसमोर "अंतिम आणि सर्वोत्तम प्रस्ताव" ठेवला आहे. "इराण हा प्रस्ताव स्वीकारतो की नाही, हे पाहावे लागेल," असे त्यांनी स्पष्ट केले. चर्चा अयशस्वी ठरल्यास पुन्हा संघर्ष भडकण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. विशेषतः तेल आणि वायू दरात वाढ, तसेच आखातातील जहाजवाहतुकीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, सौदी अरेबियाने आपल्या पूर्व-पश्चिम तेल पाइपलाइनची सेवा पुन्हा सुरू केल्याची माहिती दिली आहे, तर कतारने आखाती जहाजवाहतुकीवरील काही निर्बंध शिथिल केले आहेत. त्यामुळे परिस्थिती काही प्रमाणात नियंत्रणात असल्याचे संकेत मिळत आहेत. या चर्चेचे मध्यस्थीकरण करणाऱ्या पाकिस्तानने दोन्ही देशांना संवाद सुरू ठेवण्याचे आवाहन केले आहे. परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी सर्व पक्षांनी शस्त्रसंधीचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, चर्चेत होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण आणि इराणच्या समृद्ध युरेनियम साठ्याबाबत गंभीर मतभेद उघड झाले. इराणने आपल्या अटींवर ठाम भूमिका घेतल्याने तणाव अधिक वाढला आहे. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर परिस्थिती अधिक चिघळली होती. त्यानंतर इराणनेही प्रत्युत्तर दिल्याने संपूर्ण पश्चिम आशिया संघर्षाच्या विळख्यात सापडला आहे.

लेबनॉनमध्येही हिंसाचार वाढत असून, इस्रायलने हल्ले तीव्र केल्याने मृतांचा आकडा २ हजारांच्या पुढे गेला आहे. हिजबुल्लाहच्या हालचालींना प्रत्युत्तर म्हणून इस्रायली कारवाई सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

## संघ-भाजपमुळे संविधान धोक्यात : राहुल गांधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि भारतीय जनता पक्षावर संविधान संपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप केला. भारतातील समानतेच्या तत्त्वालाच हे दोन्ही घटक विरोध करतात, असेही त्यांनी म्हटले. १४ एप्रिल रोजी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंडी हाऊस येथे आयोजित 'रन फॉर आंबेडकर, रन फॉर कॉन्स्टिट्यूशन' मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवताना ते बोलत होते.

"आंबेडकरांचा मुख्य संदेश संविधानाचा होता. संविधानाशिवाय भारत देश अस्तित्वातच आला नसता. मात्र आज आरएसएस-भाजपच्या विचारसरणीचे लोक संविधान संपवू इच्छितात. ते काहीही बोलले तरी त्यांचे उद्दिष्ट संविधान पुसून टाकणे हेच आहे, कारण सर्वांना समान मानण्याची कल्पना त्यांना मान्य नाही," असे गांधी यांनी स्पष्ट केले. या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करताना गांधी म्हणाले की, संविधान आणि त्यातील मूल्यांचा संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणे आवश्यक आहे. "घटनात्मक मूल्यांची जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठीच या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले," असे त्यांनी सांगितले. नंतर सोशल मीडियावरील पोस्टमध्येही त्यांनी या उपक्रमाचा पुनरुच्चार करत, ही धाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शांप्रति आणि भारतीय संविधानाप्रति असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक असल्याचे म्हटले. "आज घटनात्मक मूल्यांवर हल्ले होत असताना, आपण बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन अन्याय आणि भेदभावाविरुद्ध एकत्र लढले पाहिजे," असे आवाहन त्यांनी केले.

## शिवराज चौहान केंद्रीय निरीक्षक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : बिहारच्या पुढील मुख्यमंत्रीपदाबाबत सुरू असलेल्या अटकळांना वेग आला असून भारतीय जनता पक्ष (भाजप) नेतृत्वाने केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

पाटणा येथे १५ एप्रिल रोजी होणाऱ्या संभाव्य शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांची राज्यसभेवर निवड झाल्यानंतर भाजपच्या कोट्यातून नवीन मुख्यमंत्री नेमण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १० एप्रिल रोजी नितीश कुमार यांनी राज्यसभेत खासदार म्हणून शपथ घेतल्यानंतर बिहारमध्ये सत्तांतराच्या हालचालींना वेग आला. आता भाजपकडूनच मुख्यमंत्रीपदासाठी नाव जाहीर होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्रीपदासाठी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांचे नाव आघाडीवर मानले जात आहे. याशिवाय श्रेयासी सिंह आणि संजीव चौरसिया यांचीही नावे चर्चेत आहेत.

पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, प्रशासकीय अनुभव आणि विशेषतः गृह विभाग सांभाळण्याचा अनुभव यामुळे सम्राट चौधरी यांची दावेदारी मजबूत मानली जात आहे. तसेच अत्यंत मागासवर्गीय प्रतिनिधित्वाचा विचारही पक्षाकडून केला जात असल्याचे संकेत आहेत. कुर्मी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सम्राट चौधरी हे या निकषात बसत असल्याने त्यांच्या नावाला अधिक बळ मिळत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## पश्चिम बंगालमध्ये २३ एप्रिलला पहिला टप्पा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी २३ एप्रिल रोजी १६ जिल्ह्यांतील तब्बल ३.६ कोटींहून अधिक मतदार मतदानासाठी पात्र ठरणार आहेत. या टप्प्यातील मतदान राज्याच्या राजकीय समीकरणांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

मतदारांच्या तपशीलानुसार, पहिल्या टप्प्यात १.८४ कोटी पुरुष, १.७५ कोटी महिला आणि ४६५ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणातील मतदारसंख्या लक्षात घेता प्रशासनाने व्यापक तयारी केली असून, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

जिल्हानिहाय आकडेवारी पाहता, मुर्शिदाबाद जिल्ह्यात सर्वाधिक ५०.२६ लाख मतदार आहेत. त्यानंतर पूरबा मेदिनीपूरमध्ये ४१.६० लाख आणि पश्चिम मेदिनीपूरमध्ये ३७.७० लाख मतदार आहेत. दुसरीकडे, कलिमपोंग जिल्ह्यात सर्वात कमी २.०१ लाख मतदार नोंदवले गेले आहेत.

पहिल्या टप्प्यात राज्यातील १५२ विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. उर्वरित १४२ मतदारसंघांसाठी २९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात मतदान पार पडेल, तर मतमोजणी ४ मे रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील सत्तासंघर्षाची दिशा या दोन टप्प्यांतून स्पष्ट होणार आहे. उत्तर बंगालमधील जिल्ह्यांमध्ये कूचबिहार येथे २२.६३ लाख, जलपाईगुडी येथे १७.१९ लाख, अलीपूरद्वार येथे ११.६४ लाख आणि दार्जिलिंग येथे ११.१० लाख मतदार आहेत. तसेच उत्तर दिनाजपूरमध्ये १९.६८ लाख, दक्षिण दिनाजपूरमध्ये ११.५९ लाख आणि मालदा जिल्ह्यात २७.९१ लाख मतदारांची नोंद आहे. पश्चिम विभागात बांकुरा येथे २९.१९ लाख, पुरुलिया येथे २२.५२ लाख आणि झारग्राम येथे ९.१० लाख मतदार आहेत. पश्चिम वर्धमानमध्ये १९.६५ लाख तर बीरभूममध्ये २६.९१ लाख मतदार आहेत.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मतदार याद्या अचूक आणि सर्वसमावेशक राहाव्यात यासाठी एसआयआर प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

## तामिळनाडूत द्रमुक आघाडीला २०० जागा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी २०० हून अधिक जागा जिंकेल, असा दावा मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी केला आहे. जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळत असल्याचा विश्वास व्यक्त करत त्यांनी 'द्रविड मॉडेल २.०' सरकार स्थापन करण्याचा निर्धारही व्यक्त केला.



माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत स्टॅलिन यांनी आपल्या सरकारच्या कामगिरीचा उल्लेख करताना गेल्या पाच वर्षांत राबवलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा दाखला दिला. यामध्ये 'कलाइग्नार महिला हक्क योजना' अंतर्गत दरमहा १००० रुपयांची मदत, महिलांसाठी मोफत बस प्रवास, शालेय विद्यार्थ्यांसाठी नाश्ता योजना तसेच दोन लाख शेतकऱ्यांसाठी मोफत वीज जोडणी यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

दरम्यान, स्टॅलिन यांनी विरोधी एआयडीएमके वरही जोरदार टीका केली. "एआयएडीएमकेकडे कोणतीही ठोस विचारधारा किंवा तत्त्वे नाहीत. 'दिल्ली भाजप' हेच त्यांचे मुख्यालय बनले आहे," असा आरोप त्यांनी केला. या मुलाखतीत स्टॅलिन यांनी काँग्रेससोबतच्या जागावाटपाच्या चर्चांवर, कुटुंबावरील आरोपांवर आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवरही भाष्य केले.

## महिला आरक्षण अंमलबजावणीवर घाई

# खर्गे यांचा पीएम मोदींना सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सध्या सुरू असलेल्या राज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून "राजकीय फायदा" मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

११ एप्रिल रोजी पाठवलेल्या पत्रात खर्गे यांनी 'नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३' संदर्भातील विशेष अधिवेशनाबाबत पंतप्रधानांच्या पत्राला उत्तर दिले. सप्टेंबर २०२३ मध्ये हे विधेयक संसदेने एकमताने मंजूर केले होते आणि त्यावेळी काँग्रेसने तात्काळ अंमलबजावणीची मागणी केल्याची आठवण त्यांनी करून दिली. मात्र, "गेल्या ३० महिन्यांपासून अंमलबजावणीत विलंब झाला असून, आता विरोधी पक्षांना विश्वासात न घेता विशेष अधिवेशन बोलावले जात आहे," असा आरोप खर्गे यांनी केला. मतदारसंघ पुनर्रचनेबाबत कोणताही तपशील जाहीर न करता सहकार्याची अपेक्षा ठेवणे योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

सरकारने राजकीय पक्षांशी पूर्वी सल्लामसलत केल्याच्या दाव्यालाही खर्गे यांनी फेटाळले. "सर्व विरोधी पक्षांनी २९ एप्रिलनंतर सर्वपक्षीय बैठक बोलवून या विषयावर सविस्तर चर्चा करण्याची मागणी केली आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. विशेष अधिवेशनाची वेळही संशय निर्माण करणारी असल्याचे सांगत, सध्याच्या निवडणुकांदरम्यान हा निर्णय घेतल्याने महिला सक्षमीकरणाऐवजी राजकीय हेतू साधण्याचा प्रयत्न दिसत असल्याचा आरोप त्यांनी केला.

नोटाबंदी, जीएसटी, जनगणना यांसारख्या निर्णयांचा संदर्भ देत केंद्र सरकारच्या पूर्वीच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी टीका केली. मतदारसंघ पुनर्रचनेचे परिणाम केंद्र आणि राज्यांवर दूरगामी होतील, त्यामुळे व्यापक सल्लामसलत आवश्यक असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

दरम्यान, १६ एप्रिलपासून होणाऱ्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात महिला आरक्षण कायदा २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी लागू करण्यासाठी उपाययोजना सादर होण्याची शक्यता आहे. तसेच लोकसभेची सदस्यसंख्या ८१६ पर्यंत वाढवून त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रस्तावही चर्चेत येण्याची शक्यता आहे.

## विकास आणि संस्कृती हे परस्परपूरक घटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आधुनिक विकासाचा वेग आणि संस्कृतीचे जतन हे परस्परविरोधी नसून एकमेकांना पूरक असल्याचे स्पष्ट केले. भारत मंडपम येथे आयोजित "विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या हस्तक्षेपाद्वारे आदिवासींच्या जीवनात परिवर्तन – भाषा, श्रद्धा आणि संस्कृतीचे जतन" या परिषदेत ते बोलत होते.

ही परिषद विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, नॉर्थ ईस्ट सेंटर फॉर टेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन अँड रीच आणि आयटीआयटीआय दून संस्कृती स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी संस्कृती, श्रद्धा आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील संबंधांवर चर्चा केली.

उपराष्ट्रपतींनी आदिवासी समाजाचे कौतुक करत त्यांना "भारताच्या संस्कृती आणि जैवविविधतेचे संरक्षक" असे संबोधले. भारतातील सुमारे १.४ लाख आदिवासी गावांमध्ये देशाच्या सुमारे ९ टक्के लोकसंख्या वास्तव्यास असल्याचे त्यांनी नमूद केले. या समाजाकडे जैवविविधतेचे संरक्षण आणि वनसंपत्तीचा शाश्वत वापर यासंबंधी मौल्यवान पारंपरिक ज्ञान असल्याचे त्यांनी सांगितले.

पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधल्यास विकास अधिक परिणामकारक ठरतो, असेही त्यांनी अधोरेखित केले. 'विकासही, विरासतही' हे मार्गदर्शक तत्त्व असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले. आदिवासी व्यवहार मंत्रालयाची स्थापना केल्याबद्दल माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना त्यांनी आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाला दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर तरनजीत सिंग संधू, अरुणाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री चौना में, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर आणि आयटीआयटीआय दून संस्कृती स्कूलचे संस्थापक विश्वस्त तरुण विजय उपस्थित होते.

## भाजपकडून टीएमसी उमेदवारांना धमकी

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी आरोप केला की, विधानसभा निवडणुकीनंतर बहुमताचा आकडा गाठण्यात अपयशी ठरल्यास पाठिंबा मिळवण्यासाठी भाजप टीएमसीच्या उमेदवारांना, ज्यात राज्यमंत्र्यांचाही समावेश आहे, धमक्या देत आहे. ममता यांनी असाही आरोप केला की, केंद्रातील भाजपला पश्चिम बंगालचे तीन भागांत विभाजन करायचे असून ते बिहार किंवा ओडिशामध्ये विलीन केले जाऊ शकतात.

## भाजपचा तीन ओळींचा व्हीप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय जनता पक्षाने (भाजप) १६ ते १८ एप्रिल दरम्यान होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनासाठी आपल्या सर्व खासदारांना उपस्थित राहण्याचे निर्देश देत तीन ओळींचा व्हीप जारी केला आहे.

पक्षाच्या सूचनेनुसार, या कालावधीत लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील सर्व सदस्यांनी अनिवार्य उपस्थिती राखावी. "कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही. सदस्यांनी व्हीपचे काटेकोर पालन करावे," असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. सरकारने बोलावलेल्या या अधिवेशनात महिला आरक्षण कायद्यातील प्रस्तावित सुधारणांसह महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा



होण्याची शक्यता आहे. २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या विधेयकाला गती दिली जात असल्याचे संकेत आहेत.

प्रस्तावित बदलांनुसार लोकसभेची एकूण सदस्यसंख्या ८१६ पर्यंत वाढविण्याचा विचार असून, त्यापैकी २७३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

## भाजपच्या वर्चस्वाची कसोटी; २०२९ च्या निवडणुकांच्या सेमीफायनल

# २०२६ विधानसभा निवडणुका ठरणार निर्णायक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : २०२६ मध्ये होणाऱ्या विविध राज्यांच्या निवडणुका या केवळ राज्यांच्या सत्तांतरापुरत्या मर्यादित न राहता देशाच्या एकूण राजकीय भवितव्याची दिशा ठरवणाऱ्या ठरणार आहेत. या निवडणुकांकडे राष्ट्रीय पातळीवरील 'सेमीफायनल' म्हणून पाहिले जात असून, भारतीय जनता पक्षासाठी हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

गेल्या दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने देशाच्या राजकारणात मजबूत पकड निर्माण केली आहे. मात्र, ही पकड कितपत टिकून आहे, याची खरी परीक्षा २०२६ च्या निवडणुकांत होणार आहे. मोदींच्या व्यक्तिमत्त्वाभोवती उभा राहिलेला जनाधार, त्यांच्या धोरणांवरील मतदारांचा विश्वास आणि केंद्र सरकारच्या कामगिरीबाबतची जनभावना याचे प्रतिबिंब या निकालांमध्ये दिसून येईल. सत्ताविरोधी भावना हा या निवडणुकांतील महत्त्वाचा घटक ठरू शकतो. अनेक राज्यांमध्ये दीर्घकाळ सत्तेत राहिलेल्या पक्षांविरुद्ध नाराजी वाढल्याचे संकेत मिळत असून, त्याचा फटका भाजपलाही बसू शकतो. त्यामुळे केवळ राष्ट्रीय नेतृत्वावर अवलंबून न राहता स्थानिक नेतृत्व, प्रादेशिक मुद्दे आणि सामाजिक समीकरणे यांना अधिक महत्त्व द्यावे लागणार आहे.

या निवडणुका विरोधकांसाठी मोठी संधी निर्माण करणाऱ्या ठरू शकतात. जर भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही, तर विविध विरोधी पक्षांना एकत्र येऊन पर्यायी राजकीय शक्ती उभारण्याची संधी मिळेल. अनेक राज्यांमध्ये विरोधकांमध्ये आघाड्या आणि युतींचे प्रयोग सुरू असून, त्याचा थेट परिणाम निकालांवर होऊ शकतो. सध्याच्या राजकारणात जातीय, प्रादेशिक आणि आर्थिक मुद्दे पुन्हा केंद्रस्थानी येत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेती संकट, सामाजिक समतोल यांसारखे प्रश्न मतदारांच्या निर्णयावर प्रभाव टाकू शकतात. त्यामुळे निवडणुका केवळ व्यक्तिकेंद्री न राहता मुद्दाकेंद्री होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय, २०२६ मधील निकालांचा थेट परिणाम २०२९ च्या लोकसभा निवडणुकांवर होणार आहे. या निवडणुकांमधून मतदारांचा कल, राजकीय आघाड्यांची ताकद आणि नेतृत्वाची स्वीकारार्हता याचे संकेत मिळणार आहेत. त्यामुळेच या निवडणुकांना आगामी राष्ट्रीय सत्तासंघर्षाचा पाया मानले जात आहे. या भाजपसाठी वर्चस्व टिकवण्याची आणि विरोधकांसाठी पर्याय उभा करण्याची संधी असून, देशाच्या राजकारणातील दिशा या निकालांवर अवलंबून आहे.